| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०१/०६/२०२० | | |
| नोंदणी दिनांक | : | ०१/०६/२०२० | | |
| निकाल दिनांक | : | ०७/०४/२०२६ | | |
| कालावधी | : | व | म | दि |
| | | ०५ | १० | ०६ |

# न्यायनिर्णय

## भाग – 'अ'

| | | | |
|---|---|---|---|
| निशाणी क्र. ४६ | | न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, राळेगाव, जि. यवतमाळ यांचे न्यायालयात<br>(पिठासीन अधिकारी – श्री. उमेशचंद्र एम. पाटील)<br>न्यायनिर्णय अदिघोषित दिनांक – ०७/०४/२०२६<br>नियमित फौजदारी खटला क्र. ४३/२०२० | |
| | | गु. र. क्र. १७२/२०१९, पोलीस स्टेशन, राळेगांव. | |
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे,<br>पोलीस स्टेशन, राळेगांव,<br>ता. राळेगाव, जि. यवतमाळ | |
| अभियोग पक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता पी. ए. इंगळे | |
| आरोपी | | १. | प्रमोद उर्फ अमोल महादेव जामुनकर,<br>वयः ३० वर्षे, धंदाः मजुरी, |
| | | २. | महोदव रामाजी जामुनकर,<br>वयः ६६ वर्षे, धंदाः मजुरी, |
| | | ३. | किसना महादेव जामुनकर,<br>वयः ३५ वर्षे, धंदाः मजुरी,,<br>सर्व रा. कोदुर्ली (श्रीरामपुर), ता. राळेगाव, जि. यवतमाळ. |

| | | |
|---|---|---|
| **आरोपींतर्फे विधिज्ञ** | | अधिवक्ता श्री. **डी. वाय. खैरे** |

## भाग – 'ब'
## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्रमांक ४४(II) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १४/०६/२०१९ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १५/०६/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०१/०६/२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | ११/०९/२०२३ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ११/०७/२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | ०७/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०७/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षे संदर्भात आदेशाचा दिनांक | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रमोद उर्फ अमोल महादेव जामुनकर | १६/०७/२०१९ | १६/०७/२०१९ | भा. दं. सं. चे कलम ३२५, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ | निर्दोष | – | – |
| २. | महादेव रामाजी जामुनकर | सूचनापत्रावर सोडले. | १५/०२/२०२४ | भा. दं. सं. चे कलम ३२५, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ | निर्दोष | – | – |
| ३. | किसना महादेव जामुनकर | १६/०७/२०१९ | १६/०७/२०१९ | भा. दं. सं. चे कलम ३२५, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ | निर्दोष | – | – |

## भाग – 'क'
## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्रमांक ४४(III) अन्वये)
## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्षाचे साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | दिलीप हरीभाउ मेश्राम | साक्षीदार | ३१ |
| २ | विजय मारोती आडे | साक्षीदार | ३२ |
| ३ | किसना दादाजी अलबनकर | फिर्यादी | ३७ |
| ४ | महादेव उद्धव अलबनकर | साक्षीदार | ४५ |

### ब. बचाव पक्षाचे साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

### क. न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

## अभियोग पक्षातर्फे/बचाव पक्षातर्फे/ न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | दस्त वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| – | – | – |

### ब. बचाव पक्षातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | दस्त वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| – | – | – |

## क.  न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | दस्त वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | दोषारोपपत्र | १ |

## भाग – 'ड'
## अभिलेखावरील मुद्देमाल

| अ. क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | एक लोखंडी पाईप |

## न्या य नि र्ण य
## (पारीत दिनांक ०७ एप्रिल, २०२६)

आरोपीं हे भा. दं. सं. चे कलम ३२५, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणे दंडनीय खटल्यांच्या संपरीक्षेस सामोरे गेले आहेत.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

**०२.** दि. १४/०६/२०१९ रोजी रात्री ०८.३० वाजता मोजे कोदुर्ली श्रीरामपुर, ता. राळेगांव, जि. यवतमाळ येथे सर्व आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी किसना दादाजी अलबनकर यांना डाव्या खांद्यावर आणि डाव्या डोळ्याजवळ लोखंडी पाईपने मारुन दुखापत केली आणि फिर्यादीचा चुलत भाउ महादेव अलबनकर यांना देखील लोखंडी पाईपने मारुन जखमी केले. तसेच सर्व आरोपींनी मिळून संगणमताने फिर्यादीला शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. करिता सदर घटनेबाबत फिर्यादीने आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, राळेगांव येथे तक्रार दिली.

०३. फिर्यादी यांचे फिर्यादवरुन पोलीस ठाणे, राळेगांव, ता. राळेगाव, जि. यवतमाळ येथे भारतीय दंड संहितेचे कलम ३२५, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो. हवा./१७०३, गणेश हुलके, पोलीस स्टेशन, राळेगांव यांचेकडे सुपूर्त करण्यात आला. गुन्ह्याचे तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला आणि फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदविले. सर्व तपास पूर्ण झाल्यानंतर त्यांनी दि. ०१/०६/२०२० रोजी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

०४. **नि. क्र. १४** नुसार आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२५, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवले. दोषारोपामधील मजकूर आरोपींना त्यांचे भाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपींनी त्यांना गुन्हा कबूल नाही असे निवेदन नि. क्र. १५ ते १७ वर दिले आणि प्रकरणाची संपरीक्षा करण्याची विनंती केली.

०५. आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाने चार साक्षीदारांची साक्ष नोंदविली. त्यामध्ये प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सा. क्र.१ दिलीप रामभाउ मेश्राम, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सा.क्र.२ विजय मारोती आडे, फिर्यादी सा. क्र. ३ किसना दादाजी अलबनकर व सा. क्र. ४ महादेव उद्धव अलबनकर यांना तपासले आहे. नोंदविण्यात आलेले चारही साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्यामुळे वि. सरकारी वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन नि. क्र. १ वर आदेश पारित करुन अभियोग पक्षाचा पुरावा

बंद करण्यात आला.

**०६.** सरकार पक्षाच्या पुराव्यांमध्ये कोणतीही गुन्हादर्शक परिस्थिती निर्माण झाली नसल्याचे आढळून आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदवण्यात आला नाही.

**०७.** अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा पाहता व दोन्ही बाजुचा युक्तिवाद लक्षात घेता, या खटल्याचे न्यायनिर्णयाकामी खालील मुद्दे उपस्थित होतात. मी ते खालील कारणमिमांसेद्वारे निष्कर्षास काढत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | आरोपींनी दि. १४/०६/२०१९ रोजी रात्री ०८.३० वाजता अगर त्या सुमारास मौजे श्रीरामपुर कोदुर्ली, ता. राळेगाव, जि. यवतमाळ येथे त्यांच्या समान उद्देशाच्या पुरस्सरनार्थ फिर्यादीस डाव्या खांद्यावर, डाव्या डोळ्याजवळ लोखंडी पाईपने मारहाण करुन त्यांना इच्छापूर्वक दुखापत केली, असे सरकार पक्ष सिध्द करतो काय ? | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| २. | आरोपींनी वर नमूद तारखेला, वेळी व ठिकाणी त्यांच्या समान उद्देशाचे पुरस्सरनार्थ फिर्यादीस व त्यांच्या भावांना लोखंडी पाईपने मारहाण करुन जखमी केले व इच्छापूर्वक दुखापत केली, हे सरकार पक्ष सिध्द करतो काय ? | **नाही** |
| ३. | आरोपींनी वर नमूद तारखेला, वेळी व ठिकाणी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरस्सरनार्थ फिर्यादीस शिवीगाळ करुन अपमानीत केले तसेच त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागचा उद्देश होता, असे सरकार पक्ष सिध्द करतो काय ? | **नाही** |
| ४. | आरोपींनी वर नमूद तारखेला, वेळी व ठिकाणी त्यांच्या समान उद्देशाचे पुरस्सरनार्थ फिर्यादीस फौजदारीपात्र धाक दपटशा करुन जीवे मारण्याची धमकी दिली, हे सरकार पक्ष सिध्द करतो काय ? | **नाही** |
| ५. | काय आदेश ? | **अंतिम आदेशानुसार** |

## कारणमीमांसा

०८. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करणेसाठी सरकार पक्षाने उपरोक्त एकूण चार साक्षीदार तपासलेले आहेत.

**मुद्दे क्र. १ ते ४ करीता** –

०९. पुनरावृत्ती टाळण्यासाठी मुद्दे क्र. ०१ ते ०४ चर्चेसाठी एकत्र घेतले आहेत. फिर्यादी यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, घटना अंदाजे पाच वर्षापुर्वी सायंकाळी ०८.०० च्या दरम्यान गावामधे घडली. त्या दिवशी आरोपीसोबत त्यांचा किरकोळ वाद झाला. याशिवाय इतर काहीही घडले नाही असे त्यांनी सांगितले. तसेच सा. क्र. १ दिलीप मेश्राम, सा. क्र. २ विजय आडे आणि सा. क्र. ४ महादेव अलबनकर यांनी सुध्दा त्यांच्या पुराव्यात त्यांना घटनेबाबत काहीही माहीत नसल्याचे कथन केले. सदरील फिर्यादी व सा. क्र. १, २ आणि ४ यांनी अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही. त्यामुळे वि. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाचे परवानगीने सदर साक्षीदारांना उत्तरसूचक प्रश्न विचारले परंतु अभिलेखावर अभियोगपक्षास उपयुक्त ठरेल अशा कोणत्याही बाबी आल्या नाहीत.

१०. अभिलेखावर आलेल्या एकूण पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी व सा. क्र. ४ महादेव अलबनकर जे की या प्रकरणामध्ये महत्वाचे साक्षीदार आहेत त्यांनीच आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाचे पुरस्सरनार्थ फिर्यादी व त्यांचा चुलत भाउ महादेव अलबनकर यांना लोखंडी पाईपने मारहाण करुन दुखापत केल्याचे आणि शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याचे त्यांच्या साक्षीमध्ये काहीही सांगितले नाही. याकामी उपरोक्त पुराव्यांवरुन आरोपींनी त्यांचा समान उद्देशाचे पुरस्सरनार्थ फिर्यादीस आणि त्यांचा चुलत भाउ महादेव अलबनकर यांना लोखंडी पाईपने मारहाण करुन जखमी केल्याचे आणि शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याचे स्पष्टपणे कुठेही दिसून येत नाही. अभियोग पक्षाने आरोपींवर ठेवण्यात आलेला गुन्हा शाबीत करणेसाठी सबळ व विश्वासार्ह प्रत्यक्ष किंवा परिस्थितीजन्य पुरावा सादर केला नाही. उपलब्ध पुरावा आरोपींचा

गुन्हा सिध्द करण्यास पुरेसा नाही. तथापि, अभियोग पक्षाने आरोपींचा गुन्हा सर्व वाजवी संशयापलिकडे जाऊन सिध्द केला नाही. **म्हणून मी मुद्दे क्र. ०१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.**

**मुद्दा क्र. ०५ बाबत** –

**११.** न्यायालयासमोर सरकार पक्षाने सादर केलेल्या पुराव्यांचे अवलोकन केले असता आरोपींविरुध्द लावलेले दोषारोप सरकार पक्षाने सिध्द केले नाहीत. म्हणून सबळ पुराव्या अभावी सर्व आरोपीं त्यांच्यावर ठेवण्यात आलेले भारतीय दंड संहितेचे कलम ३२५, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये दंडनीय अपराधांच्या आरोपांतून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणून **मुद्दा क्र. ०५** चे अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. **आरोपी क्र. १ ते ३** यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२५, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचा वैयक्तिक जातमुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येते.

३. गुन्हयातील जप्त मुद्देमाल मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर तो नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावा.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये मा. वरिष्ठ न्यायालयाची अपील नोटीस आल्यानंतर तेथील न्यायालयात हजर राहाण्याकरीता आरोपींनी **प्रत्येकी** रक्कम रु. १५,०००/– चे जामीन बंधपत्र व तितक्याच रकमेचा वैयक्तिक जातमुचलका द्यावा असा आदेश आरोपीला देण्यात येतो.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदीत व घोषित करण्यात आला.)**

Digitally signed by PATIL UMESHCHANDRA MADHAVRAO
Date: 2026.04.07 17:36:10 +0530

**स्थळ** – राळेगाव
**दिनांक** –०७/०४/२०२६

**(यु. एम. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राळेगाव,
**जि. यवतमाळ.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

a) **Name of the Stenographer** :- R. R. Hardiya,

b) **Court** :- Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Ralegaon.